# दुहेरी शासनपद्धती

मोगल साम्राज्याच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये प्रांत किंवा सुभा या विभागाची प्रशासन चालविण्याची जबाबदारी सुभेदार आणि दिवाण या दोन प्रमुख अधिकाऱ्यावर असे. यापैकी सुभेदार हा लष्करी व फौजदारी व्यवस्था पहात असे त्याच बरोबर लष्कराचा बंदोबस्त,न्यायदान, कायदा व पोलीस यंत्रणा या बाबी देखील त्याच्या अखत्यारीत होत्या. या व्यवस्थेला निजामत असे म्हटले जाईल. सुभेदाराचा नाजिम किंवा निजाम असाही उल्लेख केला जाई. तर महसुलाच्या वसुलीचे काम दिवाना कडे असे. या व्यवस्थेला दिवानी असे म्हटले जाई. पुढे मोगल साम्राज्याच्या शेवटच्या काळात अनेक नवाब किंवा सुभेदार स्वतंत्रपणे वागू लागले व तेच निजामती बरोबर दिवानी चे काम पाहू लागले.

**दुहेरी शासन पद्धतीची निर्मिती:-**

16 ऑगस्ट 1765 ला झालेल्या अलाहाबादच्या तहानुसार मुगल सम्राट शहाआलम ने एक फर्मान काढून बंगालचे (बंगाल बिहार व ओरिसा) दिवाणी हक्क कंपनीकडे सोपविले. याच वर्षी बंगालचा नवाब मिरजाफर याचा मृत्यू झाला.त्याचा मुलगा नज्मउद्दोल्ला ह्याला नवाब पदावर बसवितांना कंपनीने काही अटी टाकल्या. या अटीनुसार बंगालची निजामत कंपनीकडे आली. दिवानी बाबतीत कंपनीने नियुक्त केलेले नायब दिवाण कामकाज पाहतील.

1765 मध्ये कंपनीला मुगल सम्राट शहा आलम कडून बंगालचे दिवाणी हक्क आणि बंगालच्या नबाबा कडून निजामती चे हक्क प्राप्त झाले. बंगालची दिवाणी हक्क कंपनीला मिळाले असले तरी कंपनी कर वसुलीची जबाबदारी घेण्याच्या स्थितीत नव्हते. तेवढी यंत्रनाही कंपनी जवळ नव्हती. म्हणून ह्या कार्यासाठी कंपनीने दोन नायब दिवान नियुक्त केले. बंगाल भागासाठी मोहम्मद रजा खान आणि बिहार भागासाठी राजा सिताब राय हे ते नायब दिवाण होते. अशा प्रकारे संपूर्ण दीवानी व निजामतीचे कार्य भारतीयांच्या माध्यमातून केले जाऊ लागले. त्याच्या अधिकार मात्र कंपनीकडे होते. याला दुहेरी शासन प्रणाली असे नाव पडले. कायदेशीर शासक बंगालचा नबाब तर वास्तविक सत्ता कंपनीकडे होती.

**दुहेरी शासन पद्धतीबाबत रॉबर्ट क्लाइव्ह चे समर्थन:-**

बंगालच्या सध्याच्या स्थितीत नवाब नामधारी व वास्तविक सत्ता कंपनीकडे असणे आवश्यक आहे असे रॉबर्ट क्लाइव्ह चे मत होते. ही स्थिती आपण स्वीकारली पाहिजे असे त्यांनी प्रवर समितीला कळविले आणि आपल्या मतासाठी खालील कारणे दिली.

1) बंगालची पूर्ण सत्ता कंपनीने आपल्या हातात घेतली तर कंपनी चे खरे रुप समोर येईल आणि त्या स्थितीत संपूर्ण भारत कंपनीच्या विरोधात एकत्र येईल.

2) बंगाल मध्ये व्यापार करीत असलेल्या फ्रेंच, डच कंपन्या सहजासहजी इंग्रज सत्ता मान्य करणार नाहीत व त्यामुळे यांच्याकडून आत्तापर्यंत नबाबाला मिळत असलेला कर कंपनीला मिळणार नाही

3)बंगालची सत्ता कंपनीकडे आल्यास इंग्लंड व इतर परकीय शक्ती मध्ये कटूता येऊन ह्या शक्ती कंपनी विरोधी एक संयुक्त मोर्चा तयार करण्याची शक्यता निर्माण होईल.

4)शासनाची जबाबदारी सांभाळण्यास इंग्लंड जवळ तेवढे प्रशिक्षित अधिकारी नव्हते आजच्यापेक्षा तीन पट संख्येने जरी लोक उपलब्ध झाले तरी ते पुरेसे ठरणार नाही असे रॉबर्ट क्लाइव्ह ने इंग्लंडला कळविले होते. जे काही लोक कंपनीचे होते ते भारतीय रीतीरिवाज भाषा इत्यादी बाबतीत अनभिज्ञ होते.

5) कंपनीचे संचालक काही बंगालची सत्ता आपल्या हातात घेण्यास तयार नव्हते त्यामुळे कंपनीच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम होईल असे त्यांना वाटत होते ह्या संचालकांना प्रदेशा ऐवजी पैशाचा मोह जास्त होता.

6) रॉबर्ट क्लाइव्ह ची अशी धारणा होती की त्याने बंगालची सत्ता स्वतःकडे घेतली तर इंग्लंडमधील संसद कंपनीच्या कारभारात हस्तक्षेप करील.

**दुहेरी शासन व्यवस्थेचे परिणाम किंवा दोष**

**1) बंगाल कंगाल झाला:-**

या व्यवस्थेचा बंगालवर झालेला हा भयंकर परिणाम होता. भारतातील सर्वात सधन प्रांत बंगाल होता. त्याचे सुजलाम सुफलाम असे वर्णन केले जात होते. प्रत्यक्ष इंग्लंड देशा पेक्षाही अधिक संपन्न असा बंगाल होता. इंग्रजांनी मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करून भारतीयांची भयंकर पिळवणूक केली कर वसुलीचे काम क्रूरपणे करीत होते. दुष्काळात देखील सवलत किंवा दयामाया न दाखवता करोडो रुपयांची संपत्ती त्यांनी गोळा केली. प्रजेच्या अडचणी दुःख त्याच्याशी इंग्रजांचा संबंध नव्हता ते फक्त पैसा वसूली च्या मागे लागले होते आणि अधिकार नसलेला सुभेदार केवळ बघण्यापलिकडे काही करू शकत नव्हता. एवढ्या अल्प काळात शेती बुडाली उद्योगधंदे नष्ट झाले. ढाका येथील मलमल जगप्रसिद्ध होती ती कारागीरही नष्ट झाले. बंगालवर स्मशान कळा आली. आणि सुजलाम सुफलाम बंगाल भुकेकंगाल बनला.स्वार्थापोटी इंग्रजांनी बंगालची हि अशी व्यवस्था केली.

**2) कंपनीचे सेवक अधिकारी यांचा भ्रष्टाचार:-** अधिकाराचा वापर करून कंपनीने वरील प्रमाणे प्रजेची पिळवणूक चालवली होती. त्याचबरोबर व्यापारी परवाने च्या नावाखाली कंपनीचे लोकही खाजगी व्यापार करीत आणि शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असत. वेगवेगळया निमित्ताने भेटी बक्षिसे नजराणे च्या रूपाने भ्रष्टाचाराने अमाप संपत्ती मिळवीत होते. त्या गैरप्रकाराची कंपनीच्या संचालक मंडळाला शेवटी दखल घ्यावी लागली होती. प्रत्यक्ष रॉबर्ट क्लाइव वरती भ्रष्टाचार आणि गैरमार्गाने संपत्ती मिळवली याचे इंग्लडमध्ये आरोप करून चौकशी झाली होती.

**3) 1773 चा रेगुलेटिंग एक्ट:-**

पार्लमेंटने केलेला हा कायदा देखील दुहेरी राज्यव्यवस्थेचा एक परिणाम सांगता येईल. या व्यवस्थेमुळे बंगालचे जनजीवन विस्कळीत झाले. इंग्रजांविरुद्ध जनतेत मोठा असंतोष निर्माण झाला होता. तेव्हा कंपनीच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने हा कायदा संमत केला. या कायद्यानुसार कंपनीच्या कारभारावर अनेक बंधने लादली गेली

**4)वॉरेन हेस्टिंगच्या सुधारणा:-**

1772 -1785 या काळात गव्हर्नर जनरल म्हणून हेस्टींगने कार्य केले. 1772 साली तो बंगालचा गव्हर्नर म्हणून हजर झाला. तेव्हा बंगालमधील एकूण परिस्थिती फार वाईट होती. दुहेरी राज्यव्यवस्था, दुष्काळ, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी चालविलेला अन्याय व आर्थिक पिळवणूक ही त्याची कारणे होती. जनतेत असंतोष होता याचा विचार करून हेस्टिंग्जने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले सुधारणा केल्या. त्याच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट म्हणजे 1773 च्या कायद्याने त्याला गव्हर्नर हे पद मिळून मुंबई, मद्रास च्या गव्हर्नरवर त्याचे अधिकार घोषित झाले त्यामुळे हेस्टिंग्स अनेक निर्णय घेऊ शकला त्याने सर्व प्रथम 1772 साली दुहेरी राज्यव्यवस्था बंद केली. नवाब पद रद्द करून त्याला वार्षिक 16 लाख रुपये पेन्शन ठरविली. बंगालची पूर्ण सत्ता कंपनीकडे घेतली. कर वसुलीसाठी असलेले दोन नायक दिवाण यांना पदमुक्त केले. बंगाल प्रांतात अनेक प्रशासकीय सुधारणा केल्या. प्रांताचे 36 जिल्ह्यात विभाजन करून प्रत्येक जिल्ह्याला एक कलेक्टर नेमला. जिल्ह्याचे महसूल अधिकार त्याला दिले. अशा प्रकारे हेस्टिंग्जने भारतात आधुनिक प्रशासनाचा पाया घातला दुहेरी राज्यशासन पद्धतीच्या विपरित परिणामांमुळे या सुधारणा करणे भाग पडले.

## तैनाती फौज पद्धती

लॉर्ड वेलस्ली याने भारतातील कारभार जेव्हा हाती घेतला तेव्हा भारतातील इंग्रजांची परिस्थिती बिकट होती. ही परिस्थिती सुधारण्याची वेळ वेलस्ली पुढे एक आव्हानच होते. त्याने ठरवले की इंग्रजांनी आपली सर्वश्रेष्ठ सत्ता निर्माण करावी अन्यथा हा देश सोडून इंग्लंडला निघून जावे. अलिप्ततेचे धोरण सोडून द्यावे आणि आक्रमक धोरण स्वीकारावे. भारतातील अनुकूलतेचा, उपलब्ध साधन सामग्रीचा योग्य कल्पक, उपयोग करून घ्यावा आणि भारतातील कंपनीची सत्ता मजबूत करावी आणि त्याच मार्गाने जाण्याचे त्यांनी ठरवले. भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत आपले साम्राज्य वाढविणे, कंपनीला भारतातील सर्वश्रेष्ठ शक्ती बनविणे आणि भारतातील सर्व राज्यांना कंपनीवर अवलंबून राहण्याची स्थिती निर्माण करणे ही उद्दिष्टे त्याने आपल्या समोर ठेवली. कंपनीच्या शांततेच्या धोरणाचा त्याग करित वेलस्लीने सरळ सरळ युद्धनीतीचा अवलंब केला. शांततेच्या व अलिप्ततेच्या धोरणाचा कंपनीच्या शत्रूंना फायदा मिळत असे, असे त्याचे मत होते. तत्कालीन इंग्लंडमधील मंत्रिमंडळाने वेलस्लीच्या या धोरणाला पाठिंबा दिला. त्यामुळे भारतात आक्रमक धोरण स्वीकारल्यास वेलस्ली समोर कोणतीही अडचण नव्हती. त्याला प्रचंड आत्मविश्वास होता. अर्थात त्यासाठी त्याने उपाय पण शोधले होते. काही योजना मनाशी ठरविल्या होत्या. त्यापैकी त्याची इतिहास प्रसिद्ध अशी तैनाती फौजीची पद्धती ही योजना होती. या योजनेमार्फत वेलस्लीने भारतातील अनेक सत्ताधीशांना इंग्रजांच्या वर्चस्वाखाली आणले.

**तैनाती फौज पद्धती**

भारतीय राज्यांना इंग्रज नियंत्रणाखाली आणण्यासाठी वेलस्लीने तैनाती फौजेचा वापर केला.त्यामुळे भारतात इंग्रज सत्ता सर्वश्रेष्ठ बनली आणि नेपोलियन बोनापार्ट ची भीती राहिली नाही. या पद्धतीमुळे भारतात इंग्रजी साम्राज्य प्रस्थापित करणे सुलभ झाले व भारतातील विशाल प्रदेश इंग्रजांच्या हाती आला. वास्तविक पाहता वेलस्ली हा फौज पद्धतीचा प्रणेता नव्हता. आधीच अस्तित्वात असलेल्या पद्धतीचा हळूहळू विकास होत गेला.

**अल्फ्रेड लाईल यांनी भारतीय युद्धात कंपनीच्या भाग घेण्याबाबत चार अवस्था सांगितले आहेत.**

1) पहिल्या अवस्थेत आपल्या भारतीय मित्रांना म्हणजेच राज्यांना युद्धात मदत करण्यासाठी कंपनी आपली फौज किरायाने पाठवीत असे. याअंतर्गत 1786 मध्ये निजामाशी तह झाला.

2) नंतर आपल्या मित्रांच्या मदतीने कंपनी स्वतः युद्धात भाग घेऊ लागली.

3) कंपनीची मित्र राज्य सैनिक आयोजित कंपनीला पैसा पुरवू लागली. या पैशाच्या आधारावर कंपनीने इंग्रज अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सैनिक भरती करून त्यांना प्रशिक्षण देऊन शस्त्रसज्ज करण्यास प्रारंभ केला. पुढे गरजेनुसार हेच प्रशिक्षित सैन्य मित्र राज्यांना देऊन त्या ऐवजी कंपनी पैसे घेऊ लागली.

4) आणि त्याच्या शेवटच्या अवस्थेत कंपनीने मित्र राज्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पत्करून त्याकरिता तैनाती फौज त्या राज्यात ठेवणे सुरू केले. त्या ऐवजी पैसे न घेता कंपनी त्या राज्यातून काही प्रदेश घेऊ लागली.

तैनाती फौज पद्धतीची सुरुवात फ्रेंच गव्हर्नर डुप्ले यांनी भारतात सुरू केली होती.भारतीय राज्यांना आपले सैन्य किरायाने देण्यास सुरुवात केली.त्याचेच अनुकरण इंग्रजांनी केले. या पद्धतीचा सर्वप्रथम प्रयोग 1765 मध्ये झाला. त्या वर्षी अवध शी तह करून कंपनीने पैशाच्या बदली अवधचे संरक्षण करण्याचे कबूल केले.याशिवाय राजधानी लखनऊ मध्ये इंग्रज रेसिडेंट ठेवण्याचे अवध ने मान्य केले. 1787 मध्ये कंपनीने कर्नाटक नवाबाला विनंती केली की त्याने इंग्रजा शिवाय दुसऱ्या युरोपियन शक्तीची कोणतेही संबंध ठेवू नये. 1798 मध्ये सर जॉन शोअर याने अवध च्या नबाबशी तह करताना अशी अट घातली की नवाबाने इंग्रजीव्यतिरिक्त इतर युरोपियनांना सेवेत घेऊ नये किंवा कोणतेही संबंध ठेवू नये. पैशाऐवजी प्रदेशाची मागणी हा एक नैसर्गिक टप्पा होता. भारतीय राज्य धन कबूल करीत पण त्याची परतफेड न झाल्याने रक्कम वाढत जाईल म्हणून कंपनीने तैनाती फौजेचा खर्च म्हणून प्रदेशाची मागणी सुरू केली. या प्रदेशावर कंपनीची सार्वभौम सत्ता प्रस्थापित होत असे. तैनाती फौज म्हणजे कंपनी व भारतीय राज्य यातील करार होय.

कंपनीची तैनाती फौज स्वीकारणाऱ्या राज्यांना पुढील अटी मान्य कराव्या लागत असत

**तैनाती फौजेच्या अटी**

1) तैनाती फौज स्वीकारणाऱ्या राज्याने त्या फौजेचा सर्व खर्च करावयाचा असे. त्यासाठी कंपनीला पैसे किंवा आपल्या राज्याचा काही प्रदेश द्यावा लागेल. पण कंपनी प्रदेशाची मागणी करत असे.

2) त्या राजाचा परराष्ट्र व्यवहार कंपनी बघेल. कंपनीच्या परवानगीशिवाय दुसऱ्या सत्तेशी पत्रव्यवहार किंवा संबंध ठेवता येणार नाहीत.

3) अशा राज्याचा दुसऱ्या राज्याशी काही मतभेद झाल्यास कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

4) इंग्रजा शिवाय इतर युरोपियनांना आपल्या सेवेत ठेवता येणार नाही त्यात लष्करी व मुलकी दोन्ही सेवांचा समावेश असेल.

5) अशा राज्यांचे अंतर्गत व बाहय शत्रूंपासून संरक्षण करणे ही कंपनीची जबाबदारी असेल.

6) राज्याच्या अंतर्गत कारभारात कंपनी हस्तक्षेप करणार नाही.

7) या राज्यांना आपल्या राजधानीत इंग्रज रेसिडेंट ठेवावा लागेल.

**कंपनीला झालेले फायदे/तैनाती फौज पद्धतीचे गुण**

1) तैनाती फौज पद्धतीने साम्राज्य निर्मितीच्या प्रक्रियेत फितूर शत्रूसाठी भूमिका पार पाडली. कंपनीचे संरक्षण असल्याने भारतीय राज्य दुर्बल बनली. ही पद्धती स्वीकारलेल्या राज्यात गव्हर्नर जनरल आपल्या प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहत असे. आता ही राज्य आपआपसात विशेषत: इंग्रजांविरुद्ध कोणताही संघ बनू शकत नसत.

2) यामुळे कंपनीला भारतीय राज्यांच्या खर्चात एक महान संधी उपलब्ध झाले वेलस्ली यासंबंधी स्वतः लिहितो "आपली तैनाती फौज हैदराबाद, पुणे, गायकवाड, दौलतराव शिंदे यांच्याकडे ठेवल्यामुळे कंपनीला 22000 सैनिकांची दक्ष फौज मिळाली. जिचा खर्च भारतीय राज्य करतात आणि राज्यांच्या सीमा वर व आपल्या प्रदेशात समर्थपणे ठेवल्या जाऊ शकते. ही फौज तयार आहे आणि अल्प सूचनेने कोणत्याही दिशेस लढण्यास सज्ज आहे. कोणताही आर्थिक बोजा न येता ही फौज कोणत्याही भारतीय राज्याविरुद्ध वापरता येते आणि त्यामुळे कंपनीच्या प्रदेशाला जराही धक्का लागत नाही".

3) राज्यांच्या राजधानीत कंपनीचे सैन्य राहत असल्याने देशातील मोक्याच्या जागांवर कंपनीचे नियंत्रण प्रस्थापित झाले. अर्थात राज्यांचे स्वातंत्र्य कायम असल्याने इंग्रजांबद्दल इतर युरोपियन सत्तांना इर्षा करण्यासाठी संधी मिळाली नाही.

4) या पद्धतीमुळे कंपनीचे सैन्य आपल्या राजकीय सीमांच्या बऱ्याच दूर निघून गेले. परिणामी युद्ध झाले तर त्याचा कोणताही आर्थिक भार कंपनीवर पडत नव्हता. तसेच युद्धक्षेत्र बरेच दूर असल्याने कंपनीचा प्रदेश सुरक्षित राहिला.

5) या पद्धतीमुळे कंपनीला वाटत असलेली फ्रेंचांची भीती नेहमीकरता नाहीशी झाली. कारण तहानुसार कोणतेही तैनाती फौज स्वीकारलेले राज्य कंपनीच्या अनुमतीशिवाय इतर कोणत्याही युरोपियनाना सेवेत येऊ शकत नव्हते.

6) राज्यांचे परराष्ट्र संबंध कंपनीच्या नियंत्रणात आल्याने भारतीय राज्यांच्या भांडणांत कंपनी मध्यस्थ बनली.

7) तैनाती फौजेच्या अधिकाऱ्यांना भरपूर वेतन मिळू लागले. तसेच या राज्यातील इंग्रज रेसिडेंट अतिशय प्रभावशाली बनवून कालांतराने राज्यांच्या अंतर्गत कारभारात त्यांनी हस्तक्षेप करू लागले.

8) ज्या राजाने ही पद्धत स्वीकारली त्या राज्याचे अंतर्गत स्वातंत्र्य कायम ठेवले. नामधारी का असेना संबंधित राज्यात राजा सत्तेवर कायम ठेवला. त्यामुळे इंग्रजांना एकदम विरोध होण्याचा धोका राहिला नाही.

9) या पद्धतीमुळे अनेक राज्यात कंपनीचा प्रभाव, वर्चस्व वाढत गेले.

**भारतीय राज्यांची झालेली हानी किंवा तैनाती फौज पद्धतीचे दोष**

1)परराष्ट्र संबंध कंपनीच्या नियंत्रणात गेल्याने भारतीय राज्य आपले सार्वभौमत्व गमावून बसले. लष्करीदृष्ट्या राज्य दुर्बल बनली. परिणामी भारतीय राज्यांची मानसिक बळ खच्ची झाले. त्यामुळे भारतीय राज्यांना अंततः ते अतिशय हानिकारक ठरले. प्रजेलाही त्याचा त्रास भोगावा लागला. थॉमस मन्रो म्हणतो "आपले स्वातंत्र्य राष्ट्रीय चारित्र्य आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या सर्व गोष्टीचा सौदा करून भारतीय राजांनी आपली सुरक्षितता विकत घेतली".

2) राज्यांच्या दैनंदिन कारभारात इंग्रज रेसिडेंट चा हस्तक्षेप इतका वाढला की प्रशासन चालविणे कठीण होऊन बसले. याबद्दल थॉमस मन्रो म्हणतो की तैनाती फौज पद्धतीने आपले खरे रुप दाखविले यात मला कोणतीही शंका नाही. शेवटी ही पद्धती ज्या राज्याच्या रक्षणाची जबाबदारी पत्करली आहे त्या राज्याला पूर्णपणे नष्ट करणार".

3) या पद्धतीने प्रत्येक दुर्बल तथा त्रासदायक राज्याचे रक्षण केले आणि त्याद्वारे जनतेला आपली स्थिती सुधारण्यास पासून वंचित केले. थॉमस मनरो च्या शब्दात "भारतात वाईट शासनाच्या विरोधात राजमहालातील क्रांती किंवा परकीय आक्रमण यासाठी उपाय योजना होती ती इंग्रज सैन्याच्या उपस्थितीमुळे होईनाशी झाली".

4) ही पद्धती स्वीकारलेली राज्य लवकरच दिवाळखोर बनली. कंपनी या राज्याच्या उत्पन्नाचा अंदाजे 1/3 भाग घेत होती. पण ही रक्कम इतकी जास्त होत असे की बहुतांश राज्यांकडे रक्कम थकीत राहू लागली. विदेशी लष्करी अधिकाऱ्यांचे वेतन भरभक्कम होते आणि लष्करी सामग्री इतकी महाग होती की राज्यांना आपल्या प्रजेवर जास्तीचा कर लावणे भाग पडले.थकीत रक्कमेवर कंपनी प्रदेश मागत होती. पण हा प्रदेश ही खूप मोठा असायचा. वेलस्लीने कंपनीच्या संचालकांना एका प्रसंगी लिहिले आहे की "40 लक्ष रुपये एवजी आम्ही 62 लक्ष रुपये वार्षिक उत्पन्नाचा प्रदेश मागितला आहे".

5) आणखी एक मोठा वाईट परिणाम झाला तो म्हणजे तैनाती फौजेने आपल्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारल्याने संबंधित सत्ताधीश चैन, विलासी बनले. शासन व्यवस्थेकडे त्यांची पूर्ण दुर्लक्ष झाले. त्यांच्याकडील पराक्रम, कार्यकुशलता इत्यादी गुणांचा ह्रास झाला.

वरील गुणदोषांचा विचार करता ही योजना इंग्रजांच्या दृष्टीने खूप फायद्याची ठरली हे मान्य करावी लागते. कंपनीच्या सत्तेचा भारतात प्रचंड विस्तार झाला.डॉक्टर व्ही.ए. स्मिथ यांच्या मते "या पद्धती मागे वेलस्ली चे दोन हेतू होते. एक भारतात कंपनीचे प्रभुत्व स्थापन करावयाचे आणि दुसरे म्हणजे भारतीय शक्तीचा उपयोग नेपोलियन बोनापार्ट विरुद्ध करावयाचा. हे कार्य खूप कठीण होते पण त्यात वेलस्ली यशस्वी झाला, असेच म्हणावे लागेल. या योजनेमुळे कंपनीची लष्करी ताकद बिना खर्च वाढली. अनेक राज्यात तैनाती फौज ठेवावी लागली. तेवढे प्रशिक्षित सैन्य तयार झाले आणि तेही परस्पर खर्चातून. असा दुहेरी लाभ मिळवला. सर्व फौजेवर स्वतःचे नियंत्रण ठेवले. मराठ्यांवर प्रभुत्व मिळविले हे तर वैलस्ली चे मोठे यश होते. जे वर्चस्व आणि सर्वश्रेष्ठ स्थान मराठ्यांनी मिळविले होते ते वैलस्ली ने त्यांच्याकडून हिसकावून घेतले. सारांश या पद्धती द्वारा वेलस्लीने भारतात ब्रिटिश साम्राज्य निर्मितीला सुरुवात केली हे सत्य होय.

## विलीनिकरनाचे तत्त्व

लॉर्ड डलहौसी यांनी विलिनीकरण तत्त्वाच्या आधारे भारतातील अनेक राज्य ब्रिटिश साम्राज्यात विलीन केली. पश्चिमेकडे पंजाब जिंकून इंग्रजांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार नैसर्गिक सीमेपर्यंत केला होता व पूर्वेकडे दक्षिण ब्रह्मदेश डलहौसीने जिंकला आता त्यांचे लक्ष भारतातील संस्थानकडे वळले. भारतातील जास्तीत जास्त संस्थाने सरळ ब्रिटीशांच्या ताब्यात आणावी असा त्याचा इरादा होता. भारतातील बेगडी राज्य आणि त्यांचे मध्यास्था द्वारे चालविले गेले प्रशासन यामुळे प्रजेच्या दुःखात अधिकच भर पडली आहे ही डलहौसी ची आवडती समजूत होती. डलहौसी ची स्पष्ट आणि सरळ मनोवृत्ती ही होती की मुगल सार्वभौमत्वाचा मुखवटा काढून टाकला पाहिजे आणि ती जागा घेऊ इच्छिणाऱ्या भारतीय संस्थानिक राजांना समाप्त केले पाहिजे. यासाठी डलहौसीने वेगवेगळी कारणे शोधून काढली ती पुढीलप्रमाणे.

A) दत्तक विधान नामंजूर करणे.

B) एखाद्या संस्थानात राज्यकारभार नीट चालत नाही.

C) संस्थानिकांनी खंडणी दिली नसल्यास तिच्या बदल्यात संस्थान ताब्यात घेणे.

D) संस्थानिकांना दिलेले तनखे व पेन्शन बंद करणे.

**A) दत्तकपुत्र नामंजूर:**

दत्तक विधान नामंजूर करून डलहौसीने बरीच संस्थाने ब्रिटिश साम्राज्यात विलीन केली. वस्तुतः हिंदू समाजातील परंपरेनुसार व धर्मशास्त्रानुसार एखादी व्यक्ती निपुत्रिक असेल तर तिला आपला वारस म्हणून एखाद्या मुलाला दत्तक घेण्याचा अधिकार आहे. व्यक्तिशः कुटुंबाचा वारस व संपत्तीचा किंवा राज्याचा वारस म्हणून देखील त्याला मान्यता असते. डलहौसीने घोषित केले की वंशाला वारस म्हणून निपुत्रिक राज्यकर्त्यांना दत्तक घेता येईल परंतु, हा दत्तक पुत्र त्यांच्या राज्याचा किंवा संस्थानाचा वारस म्हणून मान्य केला जाणार नाही. याबाबत शासनाकडे संस्थानिकांनी विनंती करावी. शासन प्रत्येकाचा स्वतंत्रपणे विचार करून त्याबाबत दत्तकाची अनुमती द्यावयाची की नाही हे शासनाच्या मर्जीवर अवलंबून असेल.

**दत्तक विधान नाकारून डलहौसीने पुढील संस्थाने कंपनीच्या साम्राज्यात विलीन केली**

**1) सातारा: (1848)**

विलीनीकरण सिद्धांतानुसार विलीन झालेले पहिले राज्य सातारा होय. 1848साली डलहौसीने सातारचे राज्य खालसा केले. यापूर्वीच 30 वर्षे अगोदर 1818 मध्ये मराठा सत्ता नष्ट केली होती पण सातारच्या छत्रपती चे राज्य इंग्रजांनी कायम ठेवले होते. 1848 ला छत्रपती प्रतापसिंह व त्यांचे बंधू शहाजी भोसले मृत्यू पावले. मृत्युपूर्वी त्यांनी दत्तक घेतले होते, पण डलहौसीने दत्तक पुत्रास परवानगी नाकारली.

**2)नागपूर:**

नागपूरचा राजा तिसरा रघुजी भोसले 1853 मध्ये मृत्यू पावला. ब्रिटिशांना हे संस्थान वऱ्हाड ला जाण्यासाठी मार्ग म्हणून हवे होते तसेच या ठिकाणी कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होई. हा कापूस इंग्लंडच्या कापड गिरण्या मध्ये पाठवायचा होता. नागपूरच्या राजाने मृत्यूपूर्वी अनेक वेळा दत्तक घेण्यासाठी कंपनीकडे परवानगी मागितली होती. पण कंपनी सरकारने परवानगी दिली नाही. राजाच्या सूचनेनुसार राणीने नात्यातील एक मुलगा दत्तक घेण्याचे ठरविले परंतु राज्याच्या मृत्यूमुळे ते लांबणीवर पडले. पुन्हा राणीने डलहौसी कडे दत्तक विधान मंजुरी मागितली पण ती नाकारून नागपूरकर भोसल्यांचे राज्य व खालसा करून ब्रिटिशांच्या ताब्यात घेतले.

**3) झांसी:**

1838 मध्ये येथील राजा गंगाधरराव यांना झाशीच्या राजा म्हणून कंपनी सरकारने मान्यता दिली होती. गंगाधररावने मृत्यूपूर्वी एक

मुलगा दत्तक घेतला होता, परंतु डलहौसीने त्याला मंजुरी दिली नाही. राज्याला वारस नाही म्हणून त्याने झाशीचे राज्य खालसा करून ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले.

**4)इतर राज्य:**

दत्तक वारस नामंजूर करून डलहौसीने इतरही अनेक राज्य खालसा केली आणि ब्रिटिश साम्राज्याचा भाग बनविला. उदाहरणात:उदयपुर,बघाट, संबलपूर,जैतपुर ही राज्य याच कारणामुळे खालसा केली.

**B) एखाद्या संस्थानात राज्य कारभार नीट चालत नाही:-**

**अवध (अयोध्या):** बक्सारची लढाई अवधचा नवाब पराभूत झाल्यानंतर इंग्रजांनी मनात आणले असते तर त्याच वेळी अवधचे राज्य कंपनीत विलीन करता आले असते. परंतु बंगालमध्ये नुकतीच इंग्रज सत्तेची सुरुवात झाली होती म्हणून कंपनीने सावधगिरीचे धोरण स्वीकारले. अवध च्या नबाबा कडून अल्लाहाबाद व कोरा हे दोन जिल्हे घेण्यात आले. यानंतर लॉर्ड वेलस्ली ने नबाबास तैनाती फौज स्वीकारावयास लावली. नबाबाकडून गंगा-यमुना प्रदेशातील दक्षिणेकडचे जिल्हे व रोहीलखंड हा प्रदेश घेतला. त्यानंतर अंतर्गत शांतता आणि बाह्य सुरक्षितता याबाबतीत अवधचा नबाब दिवसेंदिवस कंपनी वर विसंबून राहू लागला. लोक कल्यानाकडे दुर्लक्ष झाले आणि त्यामुळे कंपनी व नबाब यांच्या वाईट प्रशासनामुळे व वाढत्या आर्थिक बोजा मुळे अवध ची प्रजा भरडून निघाली. फौजेचा वाढता खर्च, ब्रिटिशांकडून लावले जाणारे विविध कर व पैसे उकळणारे करार व असाहाय्य परंतु विलासी नवाब यामुळे अवधच्या राज्याची स्थिती वरचेवर बिघडत गेली. जनतेच्या भल्यासाठी अवधचे राज्य इंग्रजांच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे अशी शिफारस डलहौसीने मायदेसीच्या ब्रिटिश सरकारकडे केली. इंग्लंडमधून मान्यता मिळताच डलहौसीने अवधचे राज्य खालसा करून 1856 मध्ये ब्रिटिश साम्राज्यात विलीन केले.

**C) संस्थानिकांनी खंडणी दिली नसल्यास तिच्या बदल्यात संस्थान ताब्यात घेणे:-**

**निजाम**:- हे कारण डलहौसीने हैदराबादच्या निजामाच्या राज्यात लागू केले. लॉर्ड वेलस्ली च्या काळात निजामाला तेनाती फौजी च्या रूपाने इंग्रजांनी आपल्या वर्चस्वाखाली आणले होते. या फौजेच्या खर्चापोटी निजामाकडून बऱ्याच वर्षाची रक्कम देणे बाकी होते. सुमारे 11 कोटी रुपये थकबाकी झाली होती आणि एवढी रक्कम देणे निजामाला शक्य नव्हते. डलहौसीला हे कारण बरोबर सापडले त्याने 1853 ला निजामाशी नवीन तह केला त्यानुसार त्याने निजामाकडून वऱ्हाड प्रदेश काबीज केला.

**D) संस्थानिकांना दिलेले तनखे व पेन्शन बंद करणे**

**1) पेशवा बाजीराव:-**

मराठ्यांचा पेशवा दुसरा बाजीराव 18 18 मध्ये मराठा सत्ता इंग्रजांच्या हाती सोपविल्यानंतर पेन्शन घेऊन कानपुर जवळ बिठूर येथे राहत होता. बाजीराव 1852 मध्ये मरण पावला. बाजीरावने मृत्यूपूर्वी धोंडोपंत उर्फ नानासाहेब यास दत्तक घेतले होते. बाजीराव ला वार्षिक आठ लाख रुपये पेन्शन मिळत होती. नानासाहेबांना ही पेन्शन देण्यास डलहौसीने नकार दिला. नानासाहेबाने आपल्याला ही पेन्शन वारसाहक्काने मिळावी यासाठी खूप प्रयत्न केले परंतु ते असफल ठरले.

**2)कर्नाटकचा नबाब:-**

कर्नाटकचा नबाब 1855 मध्ये मरण पावला. तो निपुत्रिक होता डलहौसीने गादीला वारस नाही या मुद्यांच्या आधारावर नबाबाचे पद व पेन्शन दोन्ही रद्द केले.

**3)तंजावर:-**

1855 मध्ये तंजावरचा राजा सर्फोजी चा मृत्यू झाला त्यालाही मुलगा नव्हता म्हणून डलहौसीने त्याचे पद व पेन्शन बंद केली. वस्तुतः राजाला मुली होत्या परंतु त्यांचा वारसा हक्क अमान्य करण्यात आला.

लॉर्ड डलहौसीने शोधून काढलेले दत्तक विधान नाकारण्याचा मुद्दा हिंदू परंपरेच्या विरुद्ध होता. ही एक सबब होती. डलहौसीने केलेली

स्वतंत्र राज्य व मांडलिक राज्य आणि इंग्रजांनी निर्माण केलेली राज्य हे विभाजन चुकीचे होते. कारण स्वतंत्र राज्य कोणतेच नव्हते. डलहौसीच्या एकंदरीत विलीनीकरण धोरणावरून असे दिसते की कोणत्या ना कोणत्या कारणावरून त्याला भारतातील संस्थाने खालसा करावयाची होती. नियमांची त्याला कमी नव्हती. या ठिकाणी ब्रिटिशांचे सामर्थ्य व सत्ता हाच या नियमाच्या मागचा आधार होता.